# जाहीर निवेदन

## उच्च माध्यमिक शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षण २०१८ साठी तज्ञ मार्गदर्शक नियुक्तीबाबत

**उच्च माध्यमिक शिक्षकांचे वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी सेवान्तर्गत प्रशिक्षण:-**

१) ज्या उच्च माध्यमिक शिक्षकांची सेवा १२ वर्षे व त्याहून अधिक झालेली आहे अशा उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी **"वरिष्ठ वेतनश्रेणी विषय निहाय १० दिवसांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण व संबंधितांचे ११ दिवसांचे गृहकार्य पूर्ण करणे"** यांचे आयोजन मंडळामार्फत करण्यात येते.

२) ज्या उच्च माध्यमिक शिक्षकांची सेवा २४ वर्षे पूर्ण झालेली आहे व ज्यांनी एम.एड. अथवा एम.फील. अथवा पी.एच.डी. अथवा एम.एस.ए.सी.आय.टी.(MSACIT) या संगणक अभ्यासक्रमाची शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेली आहे अशा अर्हताप्राप्त शिक्षकांसाठी **"निवडश्रेणी विषय निहाय ५ दिवसांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण व १६ दिवसांचे गृहकार्य पूर्ण करणे"** याचे आयोजन मंडळामार्फत करण्यात येते.

उपरोक्त दोन्ही प्रशिक्षणाचे आयोजन माहे मे/जून २०१८ मध्ये विभागीय मंडळनिहाय करण्याचे नियोजित आहे. या प्रशिक्षणासाठी जास्तीत जास्त ऑनलाईन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. या प्रत्यक्ष प्रशिक्षणापूर्वी तज्ञमार्गदर्शकांसाठी ३/४ दिवसांचे राज्यस्तरीय प्रशिक्षण एप्रिल/मे २०१८ मध्ये आयोजित करण्यात येईल. सदर प्रशिक्षणामध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून काम करण्याची इच्छा असलेल्या शिक्षकांनी आपली माहिती खाली दिलेल्या पात्रतेच्या निकषानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी' किंवा 'निवडश्रेणी' प्रशिक्षणाच्या तज्ञ मार्गदर्शकांसाठी दिलेला फॉर्म http://traning.mh-hsc.ac.in या लिंकवर Online भरावा. सदर निवेदन मंडळाची वेबसाईट www.mahahsscboard.maharashtra.gov.in वर ही उपलब्ध करुन दिलेले आहे.

### तज्ञ मार्गदर्शक पदासाठी अर्हता/पात्रता

**वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षणासाठी तज्ञांची समान आवश्यक पात्रता:**

(१) वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक
(२) विद्यापीठ स्तरावरील शिक्षक
(३) शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक
(४) कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक

**वरिष्ठ श्रेणी प्रशिक्षण तज्ञांसाठी अर्हता:**

१) क.महाविद्यालयातील शिक्षकांचा शैक्षणिक अनुभव किमान १२ वर्ष सेवा पूर्ण झालेला असावा.
२) क.महाविद्यालयातील शिक्षकांचे स्वत:चे वरिष्ठ श्रेणी प्रशिक्षण पूर्ण झालेले असावे.
३) वरिष्ठ महाविद्यालय/शिक्षणशास्त्र महाविद्यालय/ विद्यापीठ स्तरावरील शिक्षकांचा शैक्षणिक अनुभाव किमान १५ वर्षांचा असावा.

**निवडश्रेणी प्रशिक्षणतज्ञांसाठी अर्हता:**

१) क.महाविद्यालयातील शिक्षकांचा शैक्षणिक अनुभव किमान २४ वर्षे सेवा पूर्ण झालेला असावा.
२) क.महाविद्यालयातील शिक्षकांचे स्वत:चे निवडश्रेणी प्रशिक्षण पूर्ण झालेले असावे.
३) वरिष्ठ महाविद्यालय/शिक्षणशास्त्र महाविद्यालय/ विद्यापीठ स्तरावरील शिक्षकांचा शैक्षणिक अनुभाव किमान १५ वर्षांचा असावा.

सदर भरलेल्या फॉर्मची प्रिंट काढून आपल्या क.महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत दि.१५ जानेवारी २०१८ च्या आत राज्य मंडळ कार्यालयास सादर करावयाचा आहे. दोन्ही प्रशिक्षणासाठी तज्ञांची निवड करताना ज्यांनी २०१७ च्या प्रशिक्षणात राज्यस्तर, विभागस्तर व प्रत्येक्ष प्रशिक्षणात ज्यांनी सहभाग घेतला आहे त्यांना प्राधान्य देण्यात येईल. निवड झाल्यानंतर सर्व स्तरावरील प्रशिक्षणासाठी आवश्यकते प्रमाणे कार्य करणे बंधनकारक राहील.

दिनांक: १५ /११/२०१७
राज्य मंडळ, पुणे-४.

(कृष्णकुमार पाटील)
सचिव
राज्य मंडळ, पुणे.

---

क्रमांक : पुविमं/शाखा मूल्यमापन /से.प्र.१८/
पुणे ४११ ००५
दिनांक १६/११/२०१७

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हे :- पुणे / अहमदनगर / सोलापूर

उपरोक्त निवेदन पुणे विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेत येणा-या सर्व संबंधित मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत असून त्याप्रमाणे आपण आपल्या उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील पात्र शिक्षकांच्या निदर्शनास सदर बाब आणून देवुन पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११ ००५.

यांचे करिता